प्रजावाणी दिनांक 24/12/2025.

नांदेड पोलिसांची आंतरराज्य धडक कारवाई

# ३५ लाखांची बॅग पळवणारी टोळी कर्नाटकातून गजाआड

## १८ लाखांची रोकड जप्त

प्रतिनिधी • नांदेड

पारसेवार यांची कार पंक्चर करून गाडीतील ३५ लाख रुपयांची रोकड लंपास करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा छडा लावण्यात नांदेड पोलिसांना मोठे यश आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेने कर्नाटक राज्यातील शिमोगा जिल्ह्यातून एका मुख्य आरोपीला शिताफीने अटक केली असून, त्याच्याकडून चोरीतील १८ लाख रुपये हस्तगत करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे बॅग लिफ्टिंग करणाऱ्या टोळ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ही चोरीची घटना घडल्यानंतर पोलीस प्रशासनाने हे प्रकरण अत्यंत गांभीर्याने घेतले होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपासासाठी चार विशेष पथके तयार केली. या तपासात पोलिसांनी तंत्रज्ञानाचा कसून वापर केला असून, शहरासह विविध मार्गांवरील तब्बल २०० सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. तसेच ५० लोकांच्या सायबर फूटप्रिंट्सची आणि १५ लोकांच्या 'नॅटग्रिड' डिटेल्सची अत्यंत बारकाईने पडताळणी करण्यात आली. तपासाची व्याप्ती वाढवत पोलीस पथके कोल्हापूर, सांगली, ठाणे, मुंबईसह शेजारील कर्नाटक आणि तेलंगणा राज्यात रवाना झाली होती. दरम्यान, पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे आणि त्यांच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत ही टोळी कर्नाटकच्या शिमोगा जिल्ह्यातील असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने तात्काळ शिमोगा जिल्ह्यात धाव घेतली आणि तेथील स्थानिक पोलिसांच्या मदतीने तीन ते चार दिवस मुक्काम ठोकून आरोपींचा शोध घेतला. अखेर १८ डिसेंबर रोजी • उर्वरित पान. २ वर